केसरी
पुणे, १९ फेब्रुवारी २०१८

# हुतात्मा राजगुरू विद्यालयात 'सायबर गुन्हेगारी'वर संवाद



पुणे : हुतात्मा राजगुरू विद्यालय आणि कनिष्ठ महाविद्यालयात क्विकहील आणि पंख यांच्या संयुक्त विद्यमाने 'सायबर गुन्हेगारी' या विषयावर पोलिसांशी संवाद कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले होते.

क्विकहील सीएसआर प्रमुख अजय शिर्के यांनी सायबर गुन्हे कसे घडतात आणि ते थांबविण्यासाठी आपण काय केले पाहिजे या विषयी विद्यार्थ्यांना मार्गदर्शन केले. सहाय्यक पोलिस निरीक्षक वाघमारे यांनी मुलांच्या शंकांचे निरसन केले तर दामिनी पथकाच्या पारसे यांनी मार्गदर्शन करताना मुला-मुलींसाठी कायदा समान आहे, गुन्हेगाराला शिक्षा होतेच असे सांगितले.

रयत शिक्षण संस्थेच्या पश्चिम विभाग प्रमुख आणि हुतात्मा राजगुरू विद्यालयाचे प्राचार्य चंद्रकांत जाधव म्हणाले, पंख मार्फत घेतल्या जाणाऱ्या जीवनमूल्ये प्रशिक्षणचा विद्यार्थ्यांना चांगला उपयोग होत आहे. पंख संस्थेच्या अध्यक्षा स्मिता आपटे व अन्य यावेळी उपस्थित होते.